# महाराष्ट्र विधानसभा
## तिसरे अधिवेशन, २०२४

-----------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## गुरुवार, दिनांक ०४ जुलै, २०२४ / आषाढ १३, १९४६ ( शके )

| | | |
|---|---|---|
| (१) | वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री | |
| (३) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (४) | कामगार मंत्री | |
| (५) | उद्योग मंत्री | |
| (६) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (७) | महिला व बालविकास मंत्री | |
| (८) | क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री | |
| (९) | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री | |

------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

------------------------------------

### अंजनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे राबविण्यात येत असलेल्या जलजीवन योजनेच्या त्रुटी दूर करुन नियमित पाणीपुरवठा करणेबाबत

**(१) * ८०२७० श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) गावातील मौजे अंजनवेल व पेठ अंजनवेल या दोन गावांसाठी राबविण्यात येत असलेल्या कोटयवधी रुपयांच्या जलजीवन योजनेत अनेक त्रुटी असल्यामुळे नागरिकांना पाणीपुरवठा संदर्भात अनेक अडचणी येत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलजीवन योजनेतील अनेक त्रुटी व त्यांच्या दुरुस्तीबाबत स्थानिक नागरिकांनी व पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना वेळोवेळी कळवूनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजने संदर्भात मा.मंत्री यांनी नेमलेल्या स्पेशल स्कॉडमार्फत चौकशी करुन कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन सदर गावांत पाणीपुरवठा नियमित करण्यासह संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) व (२) अंजनवेल गावातील काही ग्रामस्थांनी याबाबत तक्रार केली होती. परंतु, सदर योजनेचे काम अंदाजपत्रकानुसार सुरु असल्यामुळे सदर योजनेमध्ये कोणत्याही तांत्रिकदृष्ट्या त्रुटी नाहीत. सदर कामाबाबत कोणतीही तक्रार नसल्याबाबत ग्रामस्थ, अंजनवेल यांनी दिनांक १७.११.२०२३ व ग्रामपंचायत, अंजनवेल यांनी दिनांक २३.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

ग्रामस्थ, अंजनवेल यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गुहागर यांच्याकडे सदर योजनेची चौकशी स्पेशल स्कॉडमार्फत करण्याबाबतचे निवेदन दिनांक २४.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिले आहे.

(४) ग्रामस्थ अंजनवेल यांच्या तक्रारीनुसार कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांची ग्रामस्थ, अंजनवेल यांच्या समवेत सभा आयोजित करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयात सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेसह गैरप्रकारास आळा घालण्याकरीता करावयाच्या उपाययोजना

**(२) * ७९४५९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या परिसरात स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण विभागाकडून बारा वर्षांपूर्वी तयार करण्यात येवूनही अद्याप त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे कर्करोग रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सन २०२३ मध्ये बेरियाट्रिक शस्त्रक्रिया सुरु करून पुणे जिल्ह्यासह बाहेरील जिल्ह्यातील १२ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्यानंतर रुग्णांना दोन वर्षे डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार घ्यावे लागत असल्यामुळे परत उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना सध्या बेरियाट्रिक शस्त्रक्रिया करणारे डॉक्टरच उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, येथे तृतीयपंथीय रुग्णांकरिता सुरु केलेल्या स्वतंत्र वॉर्डबाबत तृतीयपंथीयांना माहितीच नसून सदर वॉर्डात त्यांना ट्रान्सजेंडर कार्डअभावी दाखल करून घेतले जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, येथे सर्व औषधे मोफत मिळणेकरिता पुरेसा निधी उपलब्ध असतांनाही रुग्णालयामार्फत ती न पुरविता रुग्णांना ठराविक खाजगी मेडिकल मधून औषधे खरेदी करण्यास सांगण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, या प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) कर्करोग रुग्णालयाचा सुधारीत प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यामधील त्रुटी दूर करण्याची कार्यवाही आयुक्त स्तरावर सुरु आहे. तथापि, सध्या ससून रुग्णालयात कर्करोग रुग्णांच्या उपचारासाठी आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय व वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये "टॉक्सिकोलॉजिकल स्क्रिनिंग" यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत**

**(३) * ८३१५९ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय व वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये विषबाधेचे रुग्ण उपचारासाठी येत असताना एकाही रुग्णालयामध्ये विषाचा प्रकार शोधणारी “टॉक्सिकोलॉजिकल स्क्रिनिंग” तपासणी उपलब्ध नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या विषबाधीत रुग्णाने कोणते विष प्राशन केले याचा शोध लावता येत नसल्यामुळे योग्य उपचाराअभावी रुग्णांच्या मृत्यूचे प्रमाणही वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन राज्यात सर्व रुग्णालयांमध्ये “टॉक्सिकोलॉजिकल स्क्रिनिंग” यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.
(२) नाही.
(३) सध्यातरी असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील " मे. डी - मार्ट" आस्थापनेवर कार्यरत कामगारांना लेव्हीची रक्कम, वेतन व सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(४) * ८२६६४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील १४७ मे.डी-मार्ट आस्थापनेच्या (डिपार्टमेंटल स्टोअर्स) शाखांमध्ये ३ हजार ६७५ अनोंदणीकृत असंघटीत कामगारांकडून मे.डी-मार्ट व्यवस्थापनामार्फत अल्पवेतनात अतिरिक्त कामे करण्यात येऊन कामगारांचे मजूरीसह ४१ टक्के लेव्हीची कोटयवधी रुपयांच्या रक्कमेची चोरी करुन कामगारांचे शोषण करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी मे. डी-मार्ट व्यवस्थापना विरुध्द कारवाई करण्याची मागणी माथाडी राज्य गुमास्ता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे सरचिटणीस श्री.महेंद्र जाधव यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २३ एप्रिल,२०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मे.डी-मार्ट आस्थापनेच्या १४७ शाखांमध्ये कार्यरत असलेल्या प्रतिशाखा २५ प्रमाणे ३६७५ कामगारांना त्यांची देय असलेली लेव्हीची रक्कम व कामगार कायद्याप्रमाणे आवश्यक वेतन व सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) अशा स्वरुपाचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(३) व (४) मे. डी-मार्ट (मे.ॲव्हेन्सू सुपरमार्ट लि.) ही मुख्य मालक आस्थापना आणि त्यांचे कंत्राटदार मे.प्रगती एंटरप्रायजेस या आस्थापना महाराष्ट्र राज्यातील माथाडी मंडळात नोंदीत आहेत. या आस्थापनेची एकूण १०९ डिपार्टमेंटल स्टोअर्स व ८ वेअरहाऊस असून त्यामध्ये एकूण २३८ माथाडी कामगार नोंदीत आहेत. सदर कामगारांची मजुरी व लेव्हीची रक्कम संबंधित मंडळांमध्ये नियमितपणे भरणा होत आहे.

मे.डी-मार्ट यांच्या आस्थापनेकडे अथवा त्यांच्या कंत्राटदाराकडील माथाडी कामगार व इतर असंघटीत कामगार कार्यरत आहे किंवा कसे यासंदर्भात विशेष पडताळणी मोहीम हाती घेण्यात यावी, तसेच अनोंदीत माथाडी कामगार आढळून आल्यास त्यांना नोंदीत करुन घेऊन त्यांना देय लाभ देण्याबाबत व इतर असंघटीत कामगार आढळल्यास विविध कामगार कायद्याअंतर्गत देय लाभ देण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कामगार आयुक्तांना पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हयातील शिक्षकांच्या अंतर्गत बदल्यांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५) * ८२३७२ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हा परिषदेच्या वतीने दिनांक १३ मार्च,२०२४ रोजीपासून राबविण्यात आलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हातंर्गत बदली प्रक्रियेत शासन निर्णयानुसार संवर्ग-१ मधील १ ते १२ प्रकारामध्ये असलेल्या नियमानुसार बदली प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना सुध्दा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी १३ व्या क्रमांकावरील वयाने ५३ वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांची मोठया प्रमाणात बदली केल्याचे दिनांक १० मे, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमांना डावलून प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या असल्यामुळे यामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असून ही बदली प्रक्रिया रद्द करण्यात यावी अशी मागणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन नियमानुसार बदली धोरण राबविणेसह संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) भंडारा जिल्हा परिषदेच्या वतीने दि.१३.३.२०२४ रोजी राबविण्यात आलेल्या बदली प्रक्रियेमध्ये या विभागाच्या दि.७.४.२०२१ च्या शासन निर्णयामध्ये नमूद असलेल्या प्राधान्य क्रमांकानुसार वास्तव सेवा ज्येष्ठतेप्रमाणे संवर्ग-१ व संवर्ग २ च्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत.
(२) सदर बदली प्रक्रियेत कोणताही गैरव्यवहार झालेला नसून, यासंदर्भात विदर्भ प्राथमिक शिक्षक संघ, नागपूर विभाग या संघटनेने केलेली बदली प्रकरणातील तक्रार दि.२४.५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये रितसर परत घेतली असल्याचे भंडारा जिल्हा परिषद कार्यालयास कळविले आहे.
(३) संघटनेने बदली प्रक्रिया रद्द करण्याबाबतची तक्रार मागे घेतली असल्याने व राबविण्यात आलेली बदली प्रक्रिया नियमानुसार करण्यात आलेली असल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पतंजली समुहास नागपूर येथे दिलेली जमीन विनावापर पडून असल्याबाबत

**(६) * ७९८७७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात हजारो युवकांना रोजगाराच्या संधी देण्याच्यादृष्टीने पतंजली समूहाने शासनाकडून नागपूर येथील मिहान नॉन-सेझमध्ये २३० एकर आणि काटोल एम.आय.डी.सी. येथे २०० एकर जमीन अत्यल्प दरात मिळवून सात वर्षे होवूनही सदरहू जागेवर कोणताही प्रकल्प उभारण्यात आला नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील संत्री उत्पादक आणि इतर शेतकऱ्यांना तसेच स्थानिक युवकांना रोजगार मिळेल असे सांगून शासनाने इतरांना ६० लक्ष ते १ कोटी रुपये प्रति एकर या दराने जमीन दिली असताना पतंजली समूहाला केवळ २५ लक्ष प्रति एकर या दराने जमीन देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जमिनीवर पतंजली समुहाकडून कोणताही उद्योग सुरु न करता फक्त गोदाम बांधण्यात आले असल्याने या जमीन व्यवहाराबाबत शंका उपस्थित होत असल्यामुळे ही जमीन परत घेऊन या प्रकरणाची केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नागपूर येथील मिहान नॉन-सेझमधील २३४ एकर क्षेत्रफळाचा भूखंड पतंजली फूड ॲण्ड हर्बल पार्क नागपूर प्रा.लि.यांना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मार्फत ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन आवंटित केलेला आहे. सदर भूखंडावर उत्पादन सुरु आहे.

पतंजली समुहास काटोल एम.आय.डी.सी. येथे जमीन वाटप करण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात स्मार्ट अंगणवाडी प्रकल्पाअंतर्गत अंगणवाडयांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(७) * ८१५३५ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून स्मार्ट अंगणवाडी प्रकल्पावर कोटयवधी रुपयांचा खर्च करण्यात येत असताना या अंगणवाडयामध्ये मूलभूत सुविधाच उपलब्ध नसल्यामुळे स्मार्ट अंगणवाडयांचा उद्देश सफल होत नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली, भंडारा जिल्ह्यातील अंगणवाडयांमध्ये डिजिटल शिक्षणाचा अभाव, शुद्ध पिण्याचे पाणी नसणे तसेच वीज पुरवठयाचा अभाव इत्यादी कारणांमुळे अनेक स्मार्ट अंगणवाडया केवळ कागदावरच दिसून येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंगणवाडयांमध्ये वॉटर प्युरिफायर, सिलिंग फॅन, ई-लर्निंग, बाह्य रंगकाम, बोलक्या भिंती, छत दुरुस्ती व डागडुजी, दरवाजा व खिडक्या दुरुस्ती, लायब्ररी कपाट, एलईडी टीव्ही आदि सुविधा देण्याचे शासनाचे धोरण असून वीज पुरवठयाअभावी या उपकरणांचा कोणताही वापर होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्मार्ट अंगणवाडी प्रकल्पाअंतर्गत राज्यातील अंगणवाडयांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

राज्य शासनामार्फत स्मार्ट अंगणवाडी योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येत आहे. या स्मार्ट अंगणवाडी किटमध्ये ऑफलाईन वॉटर प्युरिफायर, सिलींग फॅन, लाईट, ई-लर्निंग, एलईडी टीव्ही, बाह्य रंगकाम, बोलक्या भिंती, छत दुरुस्ती व डागडुजी, दरवाजा व खिडक्या दुरुस्ती इ. सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. उपरोक्त साहित्यातील वीजपुरवठा आवश्यक असलेल्या साहित्याकरिता सोलर सिस्टीमचा पुरवठा स्मार्ट अंगणवाडी किटमध्ये करण्यात येत असतो, जेणेकरून अंगणवाडी केंद्रामध्ये नियमित वीज जोडणी नसली तरी सोलर सिस्टीम द्वारे सदर साहित्याचा उपयोग अंगणवाडी केंद्रांमार्फत येतो.

भंडारा जिल्हयामध्ये ग्रामीण व नागरी क्षेत्रात १४१७ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून त्यापैकी स्वमालकीच्या इमारतीत १२४८ अंगणवाडी केंद्रे आहेत. सदर योजनेअंतर्गत सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये ग्रामीण क्षेत्रातील स्वमालकीच्या इमारतीतील ७४५ अंगणवाडी केंद्रांचे स्मार्ट अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यात आले आहे. तसेच गडचिरोली जिल्ह्यामध्ये ग्रामीण व नागरी क्षेत्रात २३८६ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून त्यापैकी स्वमालकीच्या इमारतीत १७१८ अंगणवाडी केंद्रे आहेत. सदर योजनेअंतर्गत सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये ग्रामीण क्षेत्रातील स्वमालकीच्या इमारतीतील ६१६ अंगणवाडी केंद्रांचे स्मार्ट अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यात आले आहे. गडचिरोली व भंडारा जिल्ह्यातील स्वमालकीच्या इमारतीमधील उर्वरित अंगणवाडी केंद्रांचे टप्प्या-टप्प्याने स्मार्ट अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यात येत आहे.

सन २०१९-२० ते २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील एकूण ११०५५६ अंगणवाडी केंद्रांपैकी ७२३७९ अंगणवाडी केंद्रे स्वमालकीच्या इमारतीमध्ये असून त्यापैकी १६८८५ अंगणवाडी केंद्रांचे स्मार्ट अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यात आले असून सदर योजने अंतर्गत अंगणवाडी केंद्रांचे टप्प्या-टप्प्याने स्मार्ट अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नागपूर येथे महिला कामगारासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमात महिलेचा झालेला मृत्यू

**(८) * ८११७२ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत महिला कामगारांना स्वयंपाकासाठी उपयोगी पडणाऱ्या विविध उत्पादनांचे (किचनकिट) वितरण करावयाचे असताना नागपूर येथे एका स्थानिक

राजकीय पक्षामार्फत दिनांक ८ ते ११ मार्च, २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात साहित्याचे वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साहित्य वाटप कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरी होऊन कार्यक्रमस्थळी उभारण्यात आलेले सुरेश भट सभागृह, रेशीमबाग, नागपूर येथील प्रवेशद्वार कोसळून त्यामध्ये एका महिलेचा दिनांक ९ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास मृत्यू होऊन अनेक महिला जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यक्रम हा शासकीय असतानाही एका राजकीय पक्षाने शासकीय यंत्रणा वापरुन कोणतेही योग्य नियोजन न केल्यामुळे झालेल्या मृत्यू प्रकरणी संबंधित राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कारवाई करावी तसेच मृत महिलेच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी राज्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक १० मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन मृत व जखमींना आर्थिक मदत देणेबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१),(२),(३) व (४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांमार्फत राज्यातील बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण करुन त्यांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत लाभ वाटप केले जाते. सदर योजनेच्या अनुषंगाने सुरक्षा संच व गृहपयोगी वस्तू संचाचे वाटप करण्याकरीता राज्यातील विविध ठिकाणी शिबिर आयोजित करुन वस्तू वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार राज्यातील वेगवेगळया भागात शिबिरे आयोजित करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींची निवेदने शासनास त्याचबरोबर मंडळास देखील प्राप्त होत असतात.

नागपूर क्षेत्रात सुरक्षा संच व गृहपयोगी वस्तू संच वाटपाकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले होते. तथापि, दिनांक ०८.०३.२०२४ ते ११.०३.२०२४ या कालावधीत सुरेश भट्ट सभागृह, रेशीम बाग, नागपूर या ठिकाणी झालेल्या शिबिराचे आयोजन हे कामगार विभागामार्फत पूर्वनियोजित होते. सदर शिबिराकरीता आवश्यक प्रशासकीय व्यवस्था, पोलीस प्रशासन, अग्निशमन दल व रुग्णवाहीका इ.बाबींचे नियोजन करण्यात आले होते.

दिनांक ०९.०३.२०२४ रोजी सदरचे शिबिर सुरु होण्यापूर्वी रांगेत उभ्या असणाऱ्या एक ६३ वर्षीय वृद्ध महिला अचानक चक्कर येऊन पडल्याने त्यांना पुढील उपचारार्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय (GMC), नागपूर येथे दाखल केले. तथापि, सदर वृद्ध महिलेचा ह्दयविकाराच्या झटक्याने मृत्यू झालेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्ह्यातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची वीज देयके थकित असल्याबाबत**

**(९) * ८३६५१ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील ४४ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची रुपये ८३ कोटींची वीज देयके थकित असल्यामुळे वीज जोडणी बंद होवून पाणी पुरवठा योजना बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज देयकाच्या थकबाकीमुळे ६ पाणीपुरवठा योजना कायमस्वरुपी बंद झाल्या आहेत तर १९ पाणीपुरवठा योजना बंद होण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकबाकीमुळे वीज पुरवठा खंडीत न करता योजना सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील एकूण ४४ प्रादेशिक योजनांपैकी थकित विद्युत देयक, योजनांची दुरुस्ती, समाविष्ट गावांची मागणी नसणे, इत्यादी कारणांमुळे ६ प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना सन २०२० ते २०२३ मध्ये बंद झालेल्या आहेत. टंचाई परिस्थिती असल्याने चालू असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या विद्युत पुरवठा थकित विद्युत देयकामुळे खंडीत करणेत आलेला नाही.
(३) अहमदनगर जिल्हा परिषदेने १५ वा वित्त आयोग बंधीत निधी, मुद्रांक शुल्क पाणीपट्टी वसुलीमधून काही प्रमाणात महावितरण कंपनीस विद्युत थकबाकी भरणेत आलेली आहे. तसेच उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि. ०९.०१.२०२३ अन्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार One Time Settlement योजना राबविण्याचे कार्यवाहीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्हयात शासकीय वापरासाठी असलेला औषध साठा फेकून दिल्याप्रकरणी चौकशी करणेबाबत

**(१०) * ८०६६५ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्हयाकरीता शासनाने उपलब्ध करुन दिलेला औषधांचा साठा तालुक्यातील स्मशानभूमी लगतच्या शेतात फेकून दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक, नंदुरबार यांनी जिल्हास्तरावर नेमलेल्या संयुक्त चौकशी समितीने सादर केलेला अहवाल स्वयंस्पष्ट नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पुन्हा सखोल चौकशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी दिनांक २० फेब्रुवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास चौकशी समिती पुर्नगठीत केली असून पुन्हा चौकशी सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुर्नगठीत समितीच्या अहवालातील निष्कर्ष काय आहे तसेच या प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नंदुरबार यांचे स्तरावरून पुनर्गठीत केलेल्या समितीच्या चौकशी अहवालानुसार, सदर मुदतबाह्य औषध साठा हा ग्रामीण रूग्णालय, धानोरा येथील असल्याचे स्पष्ट झाले असून ग्रामीण रुग्णालय, धानोरा येथील औषध निर्माण अधिकारी हे दोषी आसल्याचे दिसून आले आहे. त्यांच्याकडून मुदतबाह्य औषधांच्या किंमतीनुसार रक्कम रु.४८,५६०/- वसुली करून शासन खात्यात जमा करण्यात आलेले आहे. तसेच म.ना.से (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यात उद्योजकांनी औद्योगिक वापराकरिता खरेदी केलेल्या जमिनी मूळ मालकांना परत करणेबाबत

**(११)** * ८०५०५ **श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील मागास भागाच्या विकासासाठी शासनाने सन १९९२ मध्ये "ड प्लस" झोन जाहीर करुन उद्योजकांना अनेक सवलती देण्याचे धोरण जाहीर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोरणाचा आधार घेत एका मोठया उद्योग समुहाने औद्योगिक वसाहतीच्या नावाखाली सुमारे ३०० एकर जमीन शेतकऱ्याकडून अत्यल्प किंमतीत खरेदी करुनही त्याचा औद्योगिक वापर करीत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रयोजनासाठी घेतलेल्या जमिनी १५ वर्षांपर्यंत न वापरल्यास त्या जागा मूळ मालकाला मूळ किंमतीत परत करण्याबाबतच्या तरतूदीची अंमलबजावणी या प्रकरणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मूळ मालकांना मूळ किंमतीत जमिनी परत करणेबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) सामुहिक प्रोत्साहन योजना १९९३ नुसार वाडा तालुका जिल्हा पालघर (तत्कालीन जिल्हा ठाणे) याचा समावेश कोकण विभागात "ड प्लस" प्रवर्गात केलेला असून तदनुसार उद्योगांसाठी अनुज्ञेय सवलती देण्यात आल्या आहेत.
(२), (३) व (४) मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ (सुधारणा १९९४ व २००५) च्या कलम ६३ (१) (अ) अंतर्गत विकास आयुक्त (उद्योग) यांनी खालील औद्योगिक घटकांना खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनार्थ खालीलप्रमाणे शेतजमिन खरेदी करण्यास पूर्व परवानगी दिली आहे.

| घटकाचे नाव ठिकाण व जिल्हा | आदेश दिनांक | जमीन खरेदीस परवानगी दिलेले क्षेत्र | प्रत्यक्षात खरेदी केलेले क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) मे. मानस को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल संकुल मर्यादित (प्रियदर्शनी को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल इस्टेट) ठाणे, (चिचघर बिलवली, खारीवली, अंबिष्टे, तालुका - वाडा, जि. पालघर) | दि.३१.७.१९९६ | २३१.७० हे.आर | ११४.२६४ हे.आर |
| (२) मे.हिंदुस्थान कोका कोला बॉटलिंग साऊथ वेस्ट प्रा.लि. ठाणे, (कुडुस, तालुका- वाडा, जि. पालघर) | दि.०९.०३.१९९९ | २७.८६ हे.आर | १२.३० हे.आर |

| | | | |
|---|---|---|---|
| (३) मे.बिनानी लिडस लि. मुंबई, (खानिवली तालुका वाडा,जि. पालघर) | दि. ३०.१.२००४ | २०.६९ हे.आर | २०.९७ हे.आर |
| (४) मे. वाडा हायटेक व्हीवींग पर्क लि. मुंबई (कांदिवली,वाडा, तालुका वाडा, जिल्हा पालघर) | दि.०४.११.२००६ | १८.२६ हे.आर | १२.०० हे आर |

मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ च्या कलम ६३ (१) (अ) मध्ये ०१.०१.२०१६ मध्ये केलेल्या सुधारीत अधिसुचनेनुसार खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनार्थ जमीन खरेदी करण्यास परवानगी देण्याचे अथवा कुठल्याही प्रकारचे अधिकार आता विकास आयुक्त (उद्योग) यांना नसून त्याबाबत निर्णय घेण्यास जिल्हाधिकारी हे सक्षम प्राधिकारी आहेत. वरील तक्त्यात नमूद मे.हिंदुस्थान कोका कोला बॉटलिंग साऊथ वेस्ट प्रा.लि. ठाणे, व मे. बिनानी लिडस लि. मुंबई यांना वाटप केलेल्या जमिनीचा उपयोग औद्योगिक प्रयोजनार्थ करण्यात येत आहे.

तथापि, मे. मानस को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल संकुल मर्यादित (प्रियदर्शनी को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल इस्टेट) यांनी खरेदी केलेल्या जमिनीपैकी ९.४८ हे.आर. व मे. वाडा हायटेक व्हीवींग पर्क लि. मुंबई यांनी खरेदी केलेल्या १२ हे.आर जमिनीचा वापर १५ वर्षाचा कालावधी होऊन देखील खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनार्थ केलेला नसल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. अशाप्रकारे खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनार्थ वाटप केलेल्या जमीनीचा वापर अद्यापपर्यंत औद्योगिक प्रयोजनार्थ न केल्यामुळे सदर जमिन मूळ मालकांना परत करण्यासाठी वाडा तालुक्यातील १६८ नागरीकांनी / शेतकऱ्यांनी सक्षम प्राधिकारी म्हणून मा. जिल्हाधिकारी पालघर यांचेकडे अपील दाखल केले आहेत. सदर अपीलावर सुनावणी/आदेश पारित करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी पालघर यांचे स्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## "शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह" योजनेअंतर्गत मिळणाऱ्या अनुदानात वाढ करणेबाबत

**(१२) * ८०७११ श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी व शेतमजूरांच्या मुलींच्या सामुहिक किंवा नोंदणीकृत विवाहासाठी "शुभमंगल सामुहिक / नोंदणीकृत विवाह " ही योजना सन २००८ पासून राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत शेतकरी वा शेतमजूर कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी आवश्यक असलेले मंगळसूत्र व इतर वस्तूंच्या खरेदीसाठी प्रती जोडपे रु.१०,०००/- तर सामुहिक विवाह राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रत्येक जोडप्यामागे रु.२,०००/- एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आताच्या महागाईच्या तुलनेत सदर अनुदान अत्यंत अल्प असून यात वाढ करण्याची मागणी विविध स्तरावरुन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन "शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह" या योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय.
(२), (३) व (४) "शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह" या योजनेंतर्गत मुलींच्या विवाहासाठी आवश्यक असलेल्या वस्तुंची खरेदी करण्यासाठी देण्यात येणाऱ्या प्रति जोडपे रु.१०,०००/- च्या अनुदानात वाढ करुन प्रति जोडपे रु.२५,०००/- इतके अनुदान देण्यास, तसेच सामुहिक विवाह राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना देण्यात येणाऱ्या प्रत्येक जोडप्यामागे रु.२,०००/- च्या अनुदानात वाढ करुन प्रती जोडपे रु.२,५००/- एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यास शासन निर्णय दि.१४.०३.२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला (जि.अकोला) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्वोपचार रूग्णालयात होत असलेल्या गैरकारभाराबाबत**

**(१३)** * **८१३७५ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि. अकोला) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे सर्वोपचार रुग्णालय तसेच संलग्न असलेल्या सुपरस्पेशालीटी हॉस्पिटलमध्ये आरोग्य सुविधांची कमतरता असून रूग्ण तपासणी व चाचण्या बंद असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची तक्रार रुग्णालय प्रशासनाकडे वारंवार करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामुळे गर्भवती महिला व अन्य रुग्णांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असून त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, उक्त सर्वोपचार रूग्णालयात वार्ड क्र.१११ मध्ये दाखल झालेल्या गर्भवती महिला रूग्णास खाजगी डॉक्टरांकडून तपासण्या करून घेण्यासाठी वार्डातील परिचारीकेने दिनांक २८ एप्रिल,२०२४ रोजी वा त्यासुमारास सांगितले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रुग्णालयातील आवश्यक आरोग्य सुविधा तातडीने सुरु करणेबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राजुरा (जि.चंद्रपूर) येथील उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस (Dialysis) यंत्र सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१४)** * **८१९२८ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा (जि.चंद्रपूर) येथील उपजिल्हा रुग्णालयात राजुरा, कोरपना, जिवती या तालुक्यातील रुग्ण उपचाराकरिता येत असून विविध यंत्र सामुग्री व आरोग्य सुविधेअभावी या ठिकाणी रुग्णांवर वेळेवर उपचार होत

नसल्याने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे पाठविले जात असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे काय,

(२) असल्यास, येथे रुग्णांवरील उपचारासाठी डायलिसिस (Dialysis) यंत्र सुविधा उपलब्ध करून देणेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर, वैद्यकीय अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर, जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपूर यांचेकडे माहे मार्च,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सदर रुग्णालयात किडनी डायलिसिस (Dialysis) यंत्र व अन्य आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यातील ग्रामीण रुग्णालय स्तरापर्यंत पीपीपी तत्वावर डायलिसिस सेंटर सुरु करण्यात येत आहे. यामध्ये उपजिल्हा रुग्णालय, राजुरा या संस्थेचा समावेश करण्यात आला आहे.

(४) निरंक.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) येथील तारापूर अणूऊर्जा केंद्राच्या सुरक्षिततेसाठी करावयाच्या उपाययोजना

**(१५) * ७९७११ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील वाढवण बंदर उभारल्यास तारापूर अणूऊर्जा केंद्रास धोका निर्माण होऊन मोठी जीवितहानी होऊ शकते असा अहवाल भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती केंद्र सामुद्रिक संशोधन (इन्कॉईस) या संस्थेकडून देण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, तारापूर अणूऊर्जा केंद्राकडून आण्विक भट्टी थंड करण्याकरिता समुद्राचे पाणी आत घेऊन विशिष्ट पद्धतीने शुद्धीकरणानंतर पुन्हा ते समुद्रात सोडले जाते परंतु समुद्रात मालवाहू जहाजाद्वारे तेल गळती झाल्यास अणूऊर्जा केंद्राच्या या प्रक्रियेवर विपरीत परिणाम होऊन अपघात होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) तसेच, या बंदरासंदर्भात माहे जानेवारी, २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या जनसुनावणीमध्ये परप्रांतीय लोकांचा कोणताही संबंध नसताना त्यांची उपस्थिती मोठया प्रमाणात असल्याने स्थानिकांनी त्यास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या जनसुनावणीमधील आक्षेपांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाढवण बंदर तसेच तारापूर अणूऊर्जा केंद्राच्या सुरक्षितता यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) जनसुनावणीमध्ये काही परप्रांतीयांच्या उपस्थितीबाबत स्थानिकांनी घेतलेल्या आक्षेपांची नोंद, महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने इतिवृत्तामध्ये घेतली असून, ते इतिवृत्त केंद्रीय पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल विभाग, नवी दिल्ली यांचेकडे पुढील निर्णयासाठी सादर केले आहे.

(५) वाढवण बंदर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर "आंतरराष्ट्रीय जहाज आणि बंदर सुविधा सुरक्षा संहिता (International Ship and Port Facility Security Code)" नुसार बंदराची तसेच आसपासच्या क्षेत्राच्या सुरक्षिततेची सर्वोतोपरी खबरदारी घेतली जाणार आहे.वाढवण बंदरात तटरक्षक दलासाठी धक्क्याची तरतूद आहे, ज्यामुळे सागरी सुरक्षा आणि सुरक्षिततेची काळजी घेता येणार आहे. सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कोणत्याही संभाव्य धोक्यांना सामोरे जाण्यासाठी जहाजांवर आणि बंदरांवर पुरेसे सागरी सुरक्षा उपाययोजना करण्यास वाढवण बंदर सक्षम असणार आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नोंदणीकृत कामगारांच्या मुलांसाठी देय असणारे लाभ विहित वेळेत देणेबाबत

**(१६) * ८१६०३ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्रीमती श्वेता महाले (चिखली), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामगार विभागाकडे पुरेशे मनुष्यबळ आणि आवश्यक असणाऱ्या सर्व सेवा उपलब्ध असतांना राज्यातील नोंदणीकृत कामगारांच्या मुलांसाठी देय असणारी शिष्यवृत्ती वेळेत मिळत नसल्याने कामगारांच्या पाल्यांचे शिक्षण अपूर्ण राहत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामगारांना अनुज्ञेय असलेले लाभ विनाविलंब व पारदर्शकरित्या मिळण्याकरिता तसेच यात होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी कामगार नोंदणी, नुतनीकरण, शिष्यवृती मागणी, पाल्य विवाह अनुदान इत्यादी मागणीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविले जातात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामगार तांत्रिक बाबींमध्ये प्रशिक्षित नसल्यामुळे त्यांच्या अर्जांमध्ये त्रुटी आढळल्यास त्याची पूर्तता न करता संपूर्ण अर्ज फेटाळला जात असल्याने लाभधारकास पुन्हा अर्ज करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्या अर्जाच्या पडताळणीसाठी चार महिन्यापर्यंत वेळ दिला जात असल्याने बांधकाम, घरेलू कामगार, त्यांचे पाल्य यांना या योजनांचा वेळेत लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कामगारांना या योजनांचा विहित वेळेत लाभ देण्याबाबत तसेच यातील दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राज्यातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व विविध कल्याणकारी योजनेचे लाभ वाटप करण्यात येते. सदरची प्रक्रिया ही ऑनलाईन असून ती अविरत चालणारी आहे. तथापि, दिनांक १६.०३.२०२४ पासून लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता आदर्श आचारसंहिता संपूर्ण राज्यात लागू असल्याने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नव्याने नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटप करणे ही प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली होती. तद्नंतर मा. भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक ०६.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त सुचनांनुसार सदर प्रकिया ही नियमितपणे सुरू करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांनी मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांकरिता पात्रता निकषांच्या आधारे केलेल्या ऑनलाईन अर्जाची संबंधित जिल्हा सुविधा केंद्राकडून पडताळणी होते. ज्या अर्जामध्ये त्रुटी असतील, तर त्या त्रुटी ऑनलाईन पद्धतीने लाभार्थ्यांना कळविण्यात येतात. तसेच त्रुटींबाबतचा संदेश (Message) संबंधित लाभार्थ्यांना भ्रमणध्वनीवर देखील पाठविला जातो. त्यानुषंगाने सदर लाभार्थ्यांमार्फत त्रुटींची पूर्तता करुन पुन्हा अर्ज ऑनलाईन प्रणालीवर सादर केला जातो. सदर पडताळणीकरिता कालावधी निश्चित करण्यात आलेला नसला तरी मोठया संख्येने आवक होणारे अर्ज व त्या तुलनेने उपलब्ध असणारे अपुरे मनुष्यबळ या आधारे मंडळाच्या जिल्हा सुविधा केंद्राकडून प्राप्त अर्जाची शक्य तितक्या लवकर पडताळणी करून परिपूर्ण अर्जाचे लाभ DBT व्दारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यांवर हस्तांतरण केले जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चिल्लर-बोईसर या रस्त्याच्या दुपदरीकरणाच्या कामात त्रृटी आढळून आल्याबाबत**

**(१७)** * **८०१८८ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

( १) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने चिल्लर-बोईसर या रस्त्याच्या दुपदरीकरणाच्या कामावर दोन वर्षापूर्वी १०० कोटी रुपये खर्च केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, कोटयवधी रुपयांचा निधी खर्च करुनही अद्यापही सदर रस्त्यांवर होत असलेली अतिक्रमणे, अपुर्णावस्थेत असलेले रस्ता रुंदीकरणाचे काम, अनेक ठिकाणी तुटलेली दुभाजके, उघडी गटारे, खोदकामातील मातीचे ढीग तसेच निकृष्ट दर्जाचे काम यामुळे हा रस्ता धोकादायक बनला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्त्यांचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत तसेच संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) चिल्लर-बोईसर रस्त्याची एकूण लांबी १६.५० कि.मी. असून सदरहू रस्त्याचे चौपदरीकरण करण्याचे काम सन २०१५ साली सुरु करण्यात आले होते व सन २०१८ साली पुर्ण होणे अपेक्षित होते. तथापि, रस्त्यासाठी सन १९७२ साली झालेल्या भूसंपादनाबाबत व मोबदल्याबाबत खातेदार गावकऱ्यांनी आक्षेप नोंदविल्यामुळे कामात अडथळे निर्माण झाले व २.०१५ कि.मी. चे काम पूर्ण करता आले नाही. एकूण १६.५० कि.मी. रस्त्यापैकी १४.४८५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे चौपदरीकरण व उर्वरित २.०१५ कि.मी. सध्याच्या ७.५ मिटर रुंदीच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सन २०२२ साली अंतिम करण्यात आले. त्यानुसार झालेल्या कामावर रु.१००.२४ कोटी इतका खर्च झालेला आहे. उर्वरित २.०१५ कि.मी. लांबीच्या रस्त्याकरीता जमिनीच्या भूसंपादनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(२) सदरहू रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम वरील नमूद कारणांमुळे अपूर्ण आहे. करारनाम्यानुसार रस्त्यालगत उघडी (खुली) गटारे करण्यात आली आहेत. सदर रस्त्याचे काम करीत असताना सर्व प्रकारच्या गुणवत्ता मापदंडांचे पालन करण्यात आले आहे. तसेच सदर कामाचे आय.आय.टी. (मुंबई) यांचेमार्फत गुणवत्ता परिक्षण करुन घेण्यात आले असून त्यांच्या देखरेखीमध्ये सदर काम करण्यात आलेले आहे. सदरहू रस्त्यावर रोड फर्निचर्स आवश्यक ठिकाणी लावण्यात आले असून, त्यांची दुरुस्ती करण्याचे काम वेळोवेळी करण्यात येते.

(३) सदर रस्त्याच्या भूसंपादीत जागेची पुर्नमोजणी बाबत संबंधित गावकऱ्यांनी मागणी केली असल्यामुळे महसूल विभाग, पालघर यांचेकडून भूसंपादन व मोबदल्याबाबत आक्षेप व मागणीनुरुप नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विम्याची व्याप्ती वाढविण्याबाबत**

**(१८) * ८०२७४ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विम्याची व्याप्ती दीड लाख रुपयांवरुन पाच लाख रुपये करण्याची घोषणा शासनाने माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घोषणेला आठ महिने उलटूनही अद्यापपर्यंत त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना राज्यातील सर्व नागरीकांना लागू करण्यात येऊन त्याकरीता आवश्यक असणारा निधीच उपलब्ध करुन देण्यात आला नसल्याने सदर योजना अद्याप कार्यान्वित झालेली नाही तसेच यासाठी लागणा-या खर्चासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने रु.२२२७ कोटींचा प्रस्ताव माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना काही मोजक्याच रुग्णालयांमध्ये लागू असल्यामुळे मोठया प्रमाणात गोरगरीब रुग्ण उपचारापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत विम्याची व्याप्ती पाच लाख रुपये करण्याची केलेल्या घोषणेची अंमलबजावणी करणेसह सर्व रुग्णालयात सदर योजना लागू करणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) खरे आहे.

दि.२८ जून, २०२३ रोजी मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य संरक्षणाची मर्यादा रु.१.५० लक्ष रुपयांवरुन रु.५ लक्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय क्र. मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६ दि.२८.०७.२०२३ रोजी निर्गमित केला आहे. सदर योजना अंमलात आणणेसंदर्भातील आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) खरे नाही.

सदर विस्तारीत योजना अद्याप सर्व नागरिकांना लागू झालेली नाही मात्र योजनेसाठी आवश्यक निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये २८१२.४१ कोटी रकमेचा नियतव्यय मागणीचा प्रस्ताव दि.२७ ऑक्टोबर, २०२३ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये २२१० जी २५१ (सर्वसाधारण) या लेखाशिर्षाखाली रु. २२२७.०० कोटी नियतव्यय मागणीचा समावेश आहे.

(४) खरे नाही.

(५) दि. २८ जुलै, २०२३ शासन निर्णयातील सुधारित तरतुदींसह एकात्मिक योजना लागू करण्यासाठी विमा कंपनीची निवड करणेकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर निविदेत युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनी ही लघुत्तम दरधारक कंपनी ठरली असून दि.२० जून, २०२४ रोजी कंपनीला प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.१३००/- या विमा दराने एक वर्ष कालावधीकरिता निविदा स्विकृती पत्र देण्यात आले आहे. या अनुषंगाने विस्तारीत स्वरुपातील एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंमलात आणणेसंदर्भातील आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयात झिरो प्रिस्क्रिप्शन पॉलिसीची अंमलबजावणी करणेबाबत

**(१९) * ८१०१३ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयात झिरो प्रिस्क्रिप्शन पॉलिसी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून रुग्णांना आवश्यक असणारे सर्व औषधे रुग्णालयात मोफत उपलब्ध करून देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असे असताना, रुग्णालयातील डॉक्टर हे खाजगी औषध विक्रेत्यांशी आर्थिक संगनमत करून रुग्णांना बाहेरून औषधे आणण्याचे प्रिस्क्रिप्शन देत असल्याचे दै.पुढारी या वृत्तपत्राने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, रुग्णालय आवारात जन औषधी केंद्र असतानाही डॉक्टर रुग्णांना बाहेरून औषधे आणण्याची सक्ती करतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रुग्णालयाचे नियम डावलून खाजगी औषध विक्रेत्यांकडून औषधे घेण्याची सक्ती करण्या-या डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही. तथापि, अशा आशयाच्या बातम्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाल्या होत्या.

(२) दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये बातमी माहे ९ एप्रिल, २०२४ ला प्रसिध्द झाली होती.

(३) व (४) नाही. तथापी, वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द बातम्यांच्या आधारे चौकशी करण्यासाठी संस्थास्तरावर त्रिस्तरीय समिती नेमण्यात आली होती. समितीने संस्थेतील डॉक्टर खाजगी विक्रेत्यांकडून औषधी घेण्याची सक्ती करण्यात येत नसल्याचा अहवाल दिला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुहागर व चिपळूण (जि. रत्नागिरी) तालुक्यातील मार्गताम्हाणे-देवघर एमआयडीसी रद्द केल्याबाबत

**(२०) * ७९४८४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर व चिपळूण (जि. रत्नागिरी) तालुक्यातील १४ गावांच्या हद्दीमध्ये मार्गताम्हाणे -देवघर एमआयडीसी उभारण्यास शासनाने दिनांक २० ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एमआयडीसीमध्ये टेक्स्टाईल पार्क, फूड प्रोसेसिंग व लॉजिस्टीक बेस उदयोग असे प्रदुषणविरहित उदयोग आणून परिसरातील हजारो गरजूंना रोजगार उपलब्ध करून देण्याचा निर्णय देखील शासन स्तरावर झाला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणताही विरोध वा तक्रार नसताना सदर एमआयडीसी रद्द करण्याचा निर्णय मा. उद्योग, मंत्री यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास जाहीर केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर एमआयडीसी रद्द केल्याप्रकरणी तसेच या भागातील हिरावून घेतलेल्या बेरोजगारांचे रोजगार परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०९.०९.२०१० रोजी मऔवि अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण-६ ची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मा. तत्कालीन राज्यमंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १/७/२०१४ रोजी प्रस्तावित गुहागर व चिपळूण तालुक्यामध्ये १४ गावांचे मार्गताम्हाणे औद्योगिक क्षेत्र येथील भूसंपादनासंदर्भात बैठक घेण्यात आली होती.

(३) व (४) सदर क्षेत्राच्या संयुक्त मोजणीस शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला होता. तसेच प्रस्तावित औद्योगिक क्षेत्र संपादन न करण्याबाबत तेथील ग्रामस्थ व शेतकरी संघर्ष समिती यांनी वेळोवेळी विरोध दर्शविला असून त्याबाबतची निवेदने मा. मंत्री (उद्योग) यांना सादर केलेली आहेत. तसेच संबंधित ग्रामपंचायत यांनी भूसंपादनास विरोध असल्याबाबत ठराव पारीत केले आहेत. उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेता सदरचे क्षेत्र मऔवि अधिनियम १९६१ अन्वये दि. २/१/२०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये विनाअधिसूचित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मैंदे (शेंडेपाडा) (ता.भिवंडी, जि. ठाणे) येथे वीटभट्टीवर काम करणाऱ्या वेठबिगार मजुरांचा छळ केल्याबाबत

**(२१) * ७९४३७ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मैंदे (शेंडेपाडा) (ता.भिवंडी, जि. ठाणे) येथील वीटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांना वीटभट्टी मालकाने मारहाण करुन अमानुष छळ केल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील ११ कुटुंबातील २४ मजुरांची सुटका करण्यात आली असून त्यामध्ये १८ बालकांचा समावेश असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) भिवंडी, जि. ठाणे येथील मैंदे (शेंडेपाडा) या गावात सदरची घटना घडलेली आहे.

या प्रकरणातील फिर्यादी श्री. राजेश दशरथ मुकणे, आंबिवली, ता. वाडा, जि. पालघर यांनी पडघा पोलीस स्टेशनला तक्रार दिली असून, सदर तक्रारीमध्ये आरोपीने फिर्यादीस बयाणा रक्कम दिल्याचे सांगून मारहाण करुन फिर्यादी, त्यांची पत्नी व मुलगा यांना जबरदस्तीने गाडीत भरुन नेले असुन काम करण्यास सांगितले असल्याचे नमूद केले आहे. तसेच इतर २२ मजूरांना देखील जबरदस्तीने आणून त्यांचेकडून वीटभट्टीवर काम करुन घेत असल्याने फिर्यादीत नमूद केले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

या प्रकरणी श्री.शशीकांत गोपाळ पाटील व श्री. बाळाराम नारायण पाटील यांचे विटभट्टीवर काम करणा-या १२ कुटुंबातील ३० वेठबिगार मजुरांची सुटका करण्यात आली आहे.

मुक्त करण्यात आलेल्या ३० वेठबिगारांपैकी २९ सज्ञान व्यक्ती असून एका १७ वर्षाच्या किशोरवयीन मुलाचा समावेश आहे.
(३) आरोपी श्री. शशिकांत गोपाळ पाटील, व्यवसाय विटभट्टी, रा.खांडपे, ता. भिवंडी, जि ठाणे व श्री. बाळाराम नारायण पाटील, व्यवसाय- विटभट्टी, रा. मैदे, शेंडेपाडा, ता. भिवंडी, जि.ठाणे यांना अटक करुन दोन्ही आरोपींविरुध्द पडघा पोलीस ठाण्यामध्ये भारतीय दंडविधान संहिता सह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध सुधारणा) अधिनियम, तसेच बंधबिगार पध्दत (उच्चाटन) अधिनियम १९७६ नुसार गुन्हा रजि.नं. ११/२०२४ नोंद केलेला आहे.

त्याअनुषंगाने दोन्ही आरोपी यांना अटक करण्यात आली होती. उक्त दोन्ही आरोपींना जामीन प्राप्त झाला आहे. त्यांचेविरुध्द विशेष सत्र जिल्हा न्यायालय, भिवंडी येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

तसेच श्री. शशिकांत गोपाळ पाटील (वीटभट्टी मालक), यांचेविरुध्द उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी दिनांक ११.०१.२०२४ रोजी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, ५६ (१) (ब) अन्वये हद्दपारीचे आदेश निर्गमित केले आहेत.

अन्य आरोपी श्री. बाळाराम नारायण पाटील यांचेवर सीआरपीसी- १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, भिवंडी यांनी दि. १०.०१.२०२४ रोजी संबंधितांना वेठबिगार मुक्तता प्रमाणपत्र निर्गमित केलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) (मुंबई) मरोळ येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२२)** * **८३६३५ श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (पूर्व) (मुंबई) मरोळ येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये झोपडपट्टीधारकांसाठी बांधण्यात आलेल्या इमारतीतील ५०० सदनिका विकासक व महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी बोगस झोपडपट्टीधारक दाखवून बाहेरील व्यक्तींना विक्री केल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सिद्धिविनायक इमारत क्र.४ च्या पॉकेट क्र .१० मधील मुलभूत सुविधांकरीता राखीव असलेल्या सदनिकांमध्ये हॉटेल व्यवसाय सुरु असून अष्टविनायक इमारतीमध्ये ८-बी, पॉकेट क्र. ५ मधील २८ सदनिकांपैकी २४ सदनिकाधारकांचे बोगस वीजदेयक असल्याचा अहवाल व तक्रारी करण्यात आल्या असतांनाही महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून कोणतेही सर्वेक्षण किंवा सदनिका रिक्त करण्याबाबत कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आंबेडकर नगर इमारत क्र.५ मधील १५० सदनिका दलालांनी अतिक्रमण करून बाहेरील व्यक्तींना दिल्याबाबत मूळ झोपडीधारकांनी हरकत घेऊन तक्रार केलेली असतानाही यासंदर्भात कोणती कारवाई करण्यात आली,
(४) असल्यास, सदर इमारतीचे थकीत रुपये १५ लाखांचे वीजदेयक महामंडळाने न भरता अतिक्रमण करणाऱ्या दलालांनी सारस्वत बँकेच्या धनादेश क्र. ०४८७४८ द्वारे भरणा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबवितांना इमारतीच्या कामांना स्टॅाप वर्क नोटीस असतांना सुद्धा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असून बैठक क्र. ३९४ ठराव क्र. ६४९० नुसार विकासकास देण्यात आलेला कालावधी संपुष्टात आला असतानाही महामंडळाकडून करारनामा रद्द करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पात्र झोपडीधारकांना सदनिका वितरीत करणेबाबत तसेच अतिक्रमित व्यक्ती, दलाल व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) मरोळ औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत मऔवि महामंडळास प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सन २०२३ मध्ये मऔवि महामंडळाने केलेल्या सर्वेक्षणानुसार तसेच विकासकाने सादर केलेल्या ४६४३ सदनिका वाटप यादीनुसार या योजनेत सुमारे ४४० सदनिकांमध्ये घुसखोरी झाल्याचे दिसून येत आहे. या योजनेतील सदनिकांमध्ये घुसखोरी झाल्याचे सन २०१९ मध्ये निदर्शनास आले आहे.
(२) या योजनेत पॉकेट क्र.१० पुनर्वसीत इमारत क्र.४ येथील दुसऱ्या मजल्यावरील विकासकाचे अनुज्ञेय विक्री क्षेत्र व राखीव मुलभूत सुविधा सदनिका या क्षेत्राचा एकत्रितपणे हॉटेल व्यवसायाकरीता विकासकामार्फत वापर करण्यात येत आहे. विकासकामार्फत सदर क्षेत्र त्यांचे विक्री क्षेत्रात गणना करण्यासाठी विनंती करण्यात आली होती. परंतु त्यास मऔवि महामंडळाने मान्यता दिलेली नाही. महामंडळामार्फत दि.२३/०३/२०२४ रोजी ०९ सदनिका सील करण्यात आल्या आहेत. पॉकेट क्र.५ येथील ८ बी या पुनर्वसीत इमारतीतील २८ सदनिका पात्र झोपडीधारकांना विकासकामार्फत वाटप करण्यात आल्या होत्या. तद्नंतर प्राप्त तक्रारीनुसार या पात्र झोपडीधारकांची वीजदेयके बोगस असणारा अहवाल वीजपुरवठा प्राधिकरण मे. अदाणी इलेक्ट्रिसीटी लि. यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर २४ झोपडीधारकांना महामंडळाने अपात्र ठरविले असून या २४ सदनिकांचे बांधकाम क्षेत्र हे विकासकाच्या अनुज्ञेय असलेल्या विक्री क्षेत्राच्या अंतिम लेखाजोखा करताना वळते करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) मऔवि महामंडळामार्फत पॉकेट क्र.५ इमारत क्र.१ मधील ९७ सदनिका, पॉकेट क्र.५ इमारत क्र.२ मधील २६ सदनिका अश्या विनासोडत वापरात असलेल्या एकूण २३९ सदनिकांचे संयुक्त सर्वेक्षण Video चित्रीकरणाव्दारे करुन प्रत्यक्ष वास्तव्य करीत असलेल्या एकूण २३९ व्यक्तीस दि.२८/०२/२०२३ व दि.३१/०३/२०२३ रोजी नोटीस बजावण्यात आली. तद्नंतर दुसरी नोटीस दि.२२/०५/२०२३ रोजी लोकांच्या विरोधामुळे प्रत्यक्षात नोटीस देता आल्या नाहीत. त्यामुळे पोस्टातून पाठविण्यात आल्या होत्या. तथापि, नोटीस स्विकृत न झाल्यामुळे स्थानिक वृत्तपत्रात जाहिर सूचना दि.०७/०६/२०२३ रोजी प्रकाशित करण्यात आली होती. सदरनिकाधारकांकडून प्राप्त झालेल्या १९२ ताबा पावत्यांची सत्यता पडताळणी विकासकाकडून प्रलंबित आहे.

मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाच्या ठरावानुसार घुसखोरी झालेल्या सदनिका रिक्त करण्यास विकासक असमर्थ ठरल्यास, विकासकाचा विक्री घटक उपलब्ध नसेल तर त्या क्षेत्रफळाचे समतुल्य मुल्य विकासकाला द्यावयाच्या TDR मधून विक्री करुन वसूल करणेस मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

(४) पॉकेट क्र.३ पुनर्वसीत इमारत क्र.५ ची रहिवाशी संस्था ही अद्यापपर्यंत सहकार विभागाकडे नोंदणीकृत झालेली नसल्यामुळे वीजदेयक भरणा करण्याची जबाबदारी विकासकाची आहे. मऔवि महामंडळाकडून या योजनेतील कोणतीही देयके अदा केली जात नाहीत. सदर इमारतीच्या थकीत विद्युत देयकाचे धनादेश कोणामार्फत भरणा करण्यात आले याबाबतची मे.टाटा पॉवर यांच्याकडे पत्राव्दारे विचारणा केला असता, त्यांनी सदरहू माहिती उपलब्ध करुन देण्यास असमर्थता दर्शविली आहे. तथापि, मे.टाटा पॉवर यांना पुनश्च: विनंती करण्यात आली आहे.

(५) मऔवि महामंडळाचे संचालक मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.६२६४ नुसार अदा करावयाच्या सुधारित आशयपत्र (Revised LOI) ची योग्य अंमलबजावणी होणेकरीता तसेच उर्वरित पुनर्वसनाची कामे पूर्ण करणेकरीता  विक्री इमारतीची मंजूरी देणे आवश्यक होते. या अनुषंगाने Hillcrest C Wing या इमारतीस भाग भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले होते. संचालक मंडळाच्या बैठक क्र.३९४ ठराव क्र.६४९० नुसार योजना पूर्ण करण्यासाठी विकासक असमर्थ ठरल्यास मंजूर ठरावानुसार करारनामा रद्द करणे व इतर सर्व बाबींबाबत कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

(६) मऔवि महामंडळाने दि.२८.०३.२०२३ व दि.३१.०३.२०२३ रोजी केलेल्या सर्वेक्षणबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.०६.०४.२०२३ च्या पत्रान्वये घेतलेला आक्षेप तसेच स्थानिक रहिवाशी, राजकीय/सामाजिक कार्यकर्ते यांनी केलेला विरोध पाहता, यानुषंगाने प्रधान सचिव (उद्योग) यांचेकडे दि.२२.११.२०२३ रोजी बैठक घेण्यात आली. तद्नंतर दि.२८.०२.२०२४ रोजी मा. मंत्री (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली देखील बैठक घेण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी मऔवि महामंडळाने शासनाकडे मागितलेल्या मार्गदर्शनाच्या अनुषंगाने मरोळ औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील वाटप झालेल्या सर्व पुनर्वसीत सदनिकांतील अधिकृत व अनधिकृत सदनिकांचे पोलीस बंदोबस्तांत सर्वेक्षण करुन पुढील उचित कार्यवाही तातडीने करण्याबाबत दि.११ जून, २०२४ च्या शासन पत्रान्वये मऔवि महामंडळास मार्गदर्शन करण्यात आले आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील अंगणवाडी शाळांमध्ये स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था करणेबाबत

**(२३) * ७९५०० डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील २६७ अंगणवाडी शाळांमध्ये नळ जोडणी केलेली नसल्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच अन्य स्वच्छता सुविधा नसल्याचे माहे एप्रिल,२०२४ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छता व पाण्याअभावी विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन या शाळांना तात्काळ नळ जोडणी देऊन स्वच्छ पाणीपुरवठा व अन्य सुविधा देणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत ठाणे जिल्ह्यात ग्रामीण प्रकल्पातील १६४६ अंगणवाडी केंद्रापैकी १५५६ अंगणवाडी केंद्रांना नळ जोडणीद्वारे पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे. उर्वरित ९० अंगणवाडी केंद्रांना नळ जोडणीबाबत कार्यवाही सुरु आहे. तर नागरी प्रकल्पांमधील एकूण सर्व १८९२ अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे. जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी केंद्र व अंगणवाडी परिसरामध्ये स्वच्छता ठेवण्यात येत आहे. तसेच नागरी प्रकल्पांतर्गत अंगणवाडी केंद्राबाहेरील बाह्य परिसर स्वच्छता महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागामार्फत नियमित करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आवश्यक आरोग्यसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(२४) * ७९६३५ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मेडीकल कॉलेजशी संलग्न असलेल्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु होवून अनेक वर्षे होवून देखील तेथे पूर्ण वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसून अनेक विभागातील यंत्रसामुग्री कालबाह्य झाली असून तेथे जवळजवळ ५२५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात अद्यापही कार्ड काढणे, डॉक्टरांकडे तपासणी करणे, वैद्यकीय चाचण्या, औषधे यासाठी रुग्णांना बऱ्याच कालावधीकरिता प्रतिक्षा करावी लागत असून जेष्ठ नागरिकांना देखील याचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, न्युरोलॉजी आणि एन्डोक्रिइनोलॉजी या विभागात उपचाराकरीता येणारे रुग्ण अद्यापही बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) उपचार घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रुग्णालयात दरवर्षी औषध व सर्जिकल साहित्यासाठी सुमारे १० कोटी रुपयांची गरज असताना केवळ २ कोटीचे अल्प अनुदान मंजूर करण्यात आल्याचेही माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, कर्करोगाच्या निदानासोबतच एन्डोक्रिइनोलॉजी, थायरॉईड, मूत्रपिंड, प्रत्यारोपण, न्यूरॉलॉजी व हृदयविकाराचा झटका येणाऱ्या रुग्णांसाठी वरदान ठरणारा " न्युक्लिअर मेडिसीन " विभाग सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये सुरु करण्याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) सदर संस्थेस रुपये २ कोटी इतके अनुदान मंजूर करण्यात आलेले असून सदर संस्थेस जिल्हा नियोजन समिती मार्फत औषधे व अनुषंगिक बाबी खरेदी करण्याकरीता अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

(५) होय,

सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये न्युक्लिअर मेडीसीन विभाग सुरु करण्याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून कंत्राटदार नेमण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोरया केमिकल (जि.जळगाव) या कंपनीत बॉयलरचा स्फोट झाल्याबाबत**

**(२५) * ८३४५९ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील औद्योगिक वसाहतीमध्ये ज्वलनशील एरॅमेटीकल इंडोल या केमिकलचे उत्पादन करण्याऱ्या मोरया केमिकल कंपनीमध्ये बॉयलरच्या झालेल्या स्फोटात २ कामगारांचा मृत्यू व २२ कामगार भाजून जखमी झाल्याचे दिनांक १७ एप्रिल,२०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केमिकलने भरलेले ड्रम हे कामगाराच्या येण्या जाण्याच्या रस्त्यालगत ठेवल्याने तसेच कामगारांच्या सुरक्षाविषयक यंत्रणा तसेच अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित न ठेवल्याने सदर दुर्घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीने सुरक्षा विषयक कायद्यातील विविध तरतूदींचे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यासह मृत व जखमी कामगारांच्या कुटुंबियांना अर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मोरया केमिकल या कारखान्यात दिनांक १७/०४/२०२४ रोजी बॉयलरचा स्फोट झालेला नसून सॉल्व्हंटच्या फ्युमचा स्फोट (वेपर क्लाऊड एक्सप्लोजन) होऊन आग लागली. या घटनेत दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला होता व २३ कामगार जखमी झाले होते. जखमी कामगारांपैकी चार कामगारांचा औषधोपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेत ६ कामगारांचा मृत्यू झाला आहे. उर्वरित १९ जखमी कामगारांना औषधोपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

घटनेच्या दिवशी कारखान्यातील बॉयलरच्या बाहेरील बाजूस असलेल्या इलेक्ट्रिक केबल मध्ये स्पार्क होऊन आग लागली व ती कारखान्याच्या इंडोल विभागात पसरुन तेथे असलेल्या सॉल्व्हंट फ्युम्सच्या संपर्कात येऊन फ्युम्सचा स्फोट (व्हेपर क्लाऊड एक्सप्लोजन) झाला. त्यानंतर आग संपूर्ण कारखान्यात पसरली व कारखान्यात ठेवलेल्या केमिकलच्या ड्रमने पेट घेतला.

कारखान्यातील परिसरात केमिकलचे भरलेले ड्रम उपलब्ध होते. परंतु ते कामगारांच्या येणाजाण्याच्या रस्त्यालगत ठेवलेले नव्हते.

सदर कारखान्यात अग्निशमन यंत्रणा बसविण्यात आलेली होती. परंतु स्फोटाच्या वेळी कामगारांना अपघातस्थळापासून तात्काळ बाहेर पडावे लागल्याने कारखान्यातील अग्निशमन यंत्रणेचा वापर करता आला नाही.

(३) हे खरे आहे.

(४) कारखाने अधिनियम,१९४८ चे कलम ७ A (२) (a), महाराष्ट कारखाने नियम,१९६३ चे नियम ४ (२), नियम ७० (७) (a), नियम ७० (८) (a), च्या भंगांबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी जळगाव यांच्या न्यायालयात दिनांक ११/०६/२०२४ रोजी एक खटला दाखल करण्यांत आलेला आहे.

तसेच कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ४० (२) अन्वये सदर कारखान्यास उत्पादन प्रक्रिया बंदचे आदेश पारीत करण्यात आलेले आहे.

कारखाना व्यवस्थापनाने, मा.नुकसान भरपाई आयुक्त, जळगाव यांचे मार्फत समक्ष कामगारांच्या वारसास प्रत्येकी सुमारे ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रुपये ) सानुग्रह अनुदान म्हणून आर्थिक मदत केलेली आहे.

सदरील मयत कामगार हे राज्य कर्मचारी विमा निगम (ईएसआयसी) अंतर्गत नोंदणीकृत आहेत. मृत कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई / पेन्शन बाबतची आवश्यक ती कागदपत्रे कारखाना व्यवस्थपनाने राज्य कर्मचारी विमा निगम (ईएसआयसी) कडे दाखल केलेली आहेत. त्याअनुषंगाने नुकसान भरपाईची कार्यवाही राज्य कर्मचारी विमा निगम (ईएसआयसी) मार्फत सुरु आहे.

तसेच सर्व मृत व जखमी कामगारांच्या औषधोपचाराचा सर्व खर्च सुमारे ७३ लाख रुपये कारखाना व्यवस्थापनाने केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील उसर्ली, नेरेपाडा, शिवकर, खेरवाडी, कोळघे व पाली देवद या ग्रामपंचायतींनी रस्ते व संरक्षक भिंतीच्या कामांत केलेला गैरव्यवहार**

**(२६) * ७९९३५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील उसर्ली, नेरेपाडा, शिवकर, खेरवाडी, कोळघे या ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांची व पालीदेवद ग्रामपंचायतीत संरक्षक भिंतीच्या कामांमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांची कोटयवधी रुपयांची बनावट देयके सादर करुन जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून दिल्या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बांधकाम विभागास दिनांक १४ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांची बनावट देयके कंत्राटदाराव्यतिरिक्त इतरांच्या नावाने देवून झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषद/पीडब्ल्यूडी कंत्राटदार संघटना यांच्या प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांनी दि.१२.३.२०२४ रोजी कार्यकारी अभियंता (बांधकाम), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना सदर प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश

दिले होते. सदर आदेशानुसार या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अलिबाग यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) उक्त चौकशी समितीने प्रश्नाधिन कामांची पाहणी केली असता याप्रकरणी तयार झालेल्या दुबार प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ/काम वाटप आदेश रद्द केल्याने कोणत्याही कामाची दुबार देयके प्रदान करण्यात आलेली नाहीत.

तथापि, सदर प्रकरणी दुबार प्रशासकीय मान्यता, काम वाटप आदेश तयार करण्यास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्याचे उक्त चौकशी समितीने प्रस्तावित केले आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या स्तरावरून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील बांधकाम मजुरांसाठी सुरक्षा उपाययोजना करणेबाबत

**(२७)** * **७९८८५ श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई, विरार (जि.पालघर) शहरात मोठया प्रमाणात बांधकामे करताना मजुरांसाठी सुरक्षा उपाययोजनांचा अभाव असल्याने मजूरांचा जीव धोक्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नालासोपारा येथे एका बांधकाम निर्माणाधीन इमारतीची भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका तरुण मजूरांचा जागीच मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसई व विरार भागात बांधकामाच्या ठिकाणी होणाऱ्या दुर्घटना व त्यात मजूरांच्या होणाऱ्या मृत्यूंवर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मजूरांना संरक्षण देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१), (२), (३) व (४) चौधरी कंपाऊंड, वाकणपाडा, नालासोपारा (पूर्व) (ता. वसई जि. पालघर) येथील खुल्या जागेवर गाळा बांधण्याकरीता बांधकाम केलेली भिंत कोसळून दिनांक २०.०२.२०२४ रोजी एका कामगाराचा मृत्यू झाला आहे.

सदर अपघाताशी संबंधित बांधकाम कंत्राटदार व जागा मालक यांचेविरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४-ऐ, ३२७, ३३८ व ३४ अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०२७०/२०२४, दिनांक २८.०२.२०२४ रोजी पेल्हार पोलिस ठाणे, मिरा भाईंदर, जि.पालघर येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

तसेच मयत कामगाराच्या वारसदारास अपघात नुकसान भरपाई देणेबाबत मा.कामगार न्यायालय तथा आयुक्त, कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३, ठाणे यांच्या कार्यालयास दिनांक ०४.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजना जाहीर केलेल्या आहेत. बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच/सुरक्षा संचाचे वाटप करण्याच्या योजनेपोटी पालघर जिल्ह्यात १९,००१ एवढया कामगारांना अत्यावश्यक/सुरक्षा संचाचे वाटप करण्यात आले आहे. मात्र विकासकाने बांधकामाच्या काही ठिकाणी कामगारांना पुरेशी सुरक्षिततेची साधने न दिल्यामुळे १२ बांधकाम प्रकल्पांना बांधकामास मनाई करण्याचे आदेश

बजावण्यात आले असून त्यापैकी सुरक्षिततेच्या साधनांची उपाययोजना केल्यानंतर ९ बांधकाम प्रकल्पाचे काम पुर्ववत चालू करण्यास कामगार आयुक्त तथा मुख्य निरीक्षक यांचेमार्फत परवानगी देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.